# संगीताचा छंद

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - विद्याविकास - अंक ३४, विकास प्रकाशन, नोव्हें. १९८५)

**छंदवर्ग-प्रचलित स्वरूप :**

परीक्षा झाल्या, सुट्ट्या लागल्या की पालकांना घोर चिंता लागते! मुलांचे काय करायचे. घरी धांगडधिंगा नसावा पण मुले अगदीच हाताबाहेर नसावीत, त्यांना जरा मोकळीक मिळावी पण त्यांनी वेळ वाऱ्यावर उधळू नये - तात्पर्य त्यांच्या मनावर शिस्तीचा धोंडा नसावा, पण तरीही त्यांनी काहीतरी नवीन शिकावे असा पालकांना ध्यास लागलेला असतो. यातूनच मग वेगवेगळे उन्हाळी वर्ग, शिबिरे यांत मुलांनी सामील व्हावे असा बूट निघतो. मुलांनी जर मनापासून सहकार्य दिले तर अशा योजना यशस्वीही होतात. मुलांच्या फुरसतीचा वेळ ही पालकांची समस्या बनू नये यासाठी रामबाण योजना म्हणजे निरनिराळ्या छंदांचे शिक्षणवर्ग अशी सर्वसाधारण समजूत असलेली दिसते.

**वेगळी वाटचाल :**

पण खरे म्हणजे सर्व छंदांच्या बाबतीत मुलांना सरसकटपणे अशा शिक्षणवर्गात गुंतवून टाकणे फारसे योग्य नाही. याचे मुख्य कारण असे की वर्ग, शिक्षण इत्यादी गोष्टी मुलांच्या छंदांच्या बाबतीत लागू केल्या की पुन्हा एकदा एक प्रकारची कोंडी तयार होते. नेहमीच्या गुदमरण्यापेक्षा जराशी वेगळी कोंडी बरी असे कसे म्हणावे? अर्थ असा की संगीताकडे मुलांनी वळावे असे वाटत असेल तर वाटचाल जरा वेगळ्या वळणाची असावी.

**कानांची तयारी :**

म्हणजे काय करावे? उत्तर साधे आहे. पहिल्याने मुलांचे कान तयार करावेत. कानांची तयारी हा काय प्रकार आहे? परीक्षेची तयारी करावी तसाच हा खटाटोप असतो काय? म्हणजे पुन्हा उत्तरे लिहा, उतारे पाठ करा, सकाळी लवकर उठा आणि पास की नापास याची चिंता वाहा! सुदैवाने कानांची तयारी म्हणजे असले काही नाही. कान तयार करणे म्हणजे कान तल्लख बनविणे. सदासर्वदा आपल्याभोवती जे नाद हजारोंनी निर्माण होत असतात त्यांना नीटपणे टिपण्याची, त्यांचे वेगवेगळेपण जाणून घेण्याची कानांची शक्ती वाढविणे म्हणजे कान तयार करणे होय. संगीतापर्यंत पोचताना घ्याव्या लागणाऱ्या अनेकविध वळणांतले पहिले वळण कान तयार करण्याचे आहे; आणि ते हसत-खेळत होणे सहजपणे शक्य असते.

**कानतयारीसाठी विविध खेळ :**

यासाठी काही मजेदार खेळ खेळता येतात. नियमाने रोज खेळता येण्यासारखे आणि पाहिजे तितक्या कमी-जास्त वेळात खेळता येण्यासारखे.

**कानाचे कोडे :**

पहिल्या खेळाचे नाव आहे 'कानाचे कोडे'. खेळात भाग घेणाऱ्या सर्वांनी प्रथम एक वर्तुळ करून बसावे आणि वर्तुळाच्या केंद्रात एक गजराचे घड्याळ ठेवावे. खेळ सुरू करतानाची वेळ पाहावी आणि तेव्हापासून पाच-सात मिनिटांनी गजर घणाणेल अशी व्यवस्था करावी. यानंतर सर्व मुलांनी डोळे मिटून बसावे. गजर वाजेपर्यंत असेच बसून कोणकोणते नाद ऐकू येतात याची त्याच क्रमाने नोंद करावी. गजर वाजला की प्रत्येकाने आपल्याला काय काय नाद व ते कोणकोणत्या क्रमाने ऐकू आले याची यादी करावी. कोणाला, किती बिनचूक ऐकू येते याची ही शर्यतच म्हणावयाची. शिवाय कानाला नादांची ओळख कितपत आहे याची देखील परीक्षा यातून होते. अट एकच, उगाचच यादी वाढवायची नाही. कारण असे केल्यास सारा खेळच खोटा होईल. कानांची तयारी होण्यासाठी या प्रयत्नांचा मग काहीच उपयोग राहणार नाही. ढोबळपणे असे म्हणता येईल की, जितके अधिक आणि तऱ्हेतऱ्हेचे नाद एखाद्याला ऐकू येतील तितका त्याचा कान अधिक तयार असतो.

**नादांचे बारसे :**

आपल्या वाटचालीतले दुसरे वळणही असेच खेळकर आहे. या खेळात जरा पुढची पायरी ओलांडायची असते. नाद ऐकला व ओळखला एवढ्यावर आता भागत नाही, म्हणून एखादी वडीलधारी व्यक्ती खेळात सामील झाली तर अधिक बरे.

दुसऱ्या खेळाला नादांचे बारसे म्हणायला हरकत नाही. पुन्हा एकदा खेळाडूंनी वर्तुळाकार बसावे, मग एखाद्या मुलाने तोंडाने, हाताने, पायाने वा हलक्या-फुलक्या वस्तूच्या साहाय्याने नाद निर्माण करावा. निर्माण झालेला नाद आपल्याला कसा वाटला याचे वर्णन ऐकणाऱ्यांनी सांगावे व थोडक्यात लिहून काढावे. मौज अशी की, एकाच नादाचे वर्णन अनेकदा निरनिराळे केलेले आढळते. कधी कधी नादाचे वर्णन करण्यासाठी एक शब्दही पुरा पडू शकतो. उदाहरणार्थ, एखाद्या मुलाने जर रिकाम्या भांड्यात पाण्याचा थेंब पाडला तर निर्माण होणाऱ्या नादाचे वर्णन 'टिप' वा 'टप' या एकाच शब्दाने होऊ शकेल.

याही खेळात अट एकच पाळावी लागते. उगाच काहीतरी वर्णन करायचे नाही. ऐकू आलेला नाद आणि आपण त्याचे म्हणून करत असलेले वर्णन यात सारखेपणा वाटला पाहिजे. वर्णन सर्वांना पटले पाहिजे. उदाहरणार्थ, टपटपणाऱ्या पाण्याच्या थेंबाने निर्माण होणाऱ्या नादाचे वर्णन कुणीही - अगदी अमिताभ बच्चनने - जरी 'ढिशाँव, ढिशाँव' असे केले तरी ते कुणालाच पटणार नाही. शिवाय कान तयार करण्याच्या दृष्टीने पाहता दुसऱ्या खेळाची पायरी चढण्याचा काहीच फायदा होणार नाही हे निराळेच. या खेळात नादाला नाव शोधावे लागते. त्याचे बारसे करावे लागते. म्हणजे शब्दांचा शोध घ्यावा लागतो. वडीलधाऱ्या माणसाची मदत फायद्याची ठरू शकते ती इथे.

**नादांची पेढी :**

तिसऱ्या खेळाचे नाव आहे 'नादसंग्रह', 'नादसंचय' किंवा 'नादांची बँक'. यात लागणारे महत्त्वाचे साहित्य म्हणजे दोन छोटे ध्वनिमुद्रक (टेप-रेकॉर्डर्स्). खेळाडूंनी दोन समूह करावयाचे आणि एकेका समूहाने एकेक ध्वनिमुद्रक (टेप-रेकॉर्डर) आपल्याकडे घ्यावयाचा. दोन्ही समूहांनी निरनिराळ्या दिशांनी स्वारीवर निघायचे-अर्ध्या तासानंतर एकत्र येण्याच्या बोलीने ठरलेल्या वेळी एकत्र येताना प्रत्येक समूहाने आपापल्या ध्वनिमुद्रकावर दहा-दहा नाद गोळा करून आणावयाचे. नादांची या प्रकारे साठवण करून आणताना खेळाडूंनी दोन अटी पाळायच्या : एक अट अशी की, नाद गोळा करताना एका समूहाने कानाला गोड लागणारे तर दुसऱ्याने कानाला

कर्कश वाटणारे नादच गोळा करावयाचे! आणि दुसरी अट अशी की, नादसंचयात खेळाडूंचे स्वतःचे आवाज असता कामा नये. खेळ खेळताना हळूहळू ध्यानात येते की, नादसंचय करणे पोस्टाची दुर्मिळ तिकिटे जमविण्याइतकेच अवघड आहे.

**टाळ्यांचा पट :**

चौथ्या खेळाचे नाव आहे, 'टाळ्यांचा पट'; आणि त्याचे नाते कानांपेक्षा पायांशी व हातांशी जास्त जुळते. दोन समुहांनी समोरासमोर उभे राहायचे. मध्ये एखाद्या वडीलधाऱ्याने एक ते दहापर्यंतच्या कोणत्याही संख्येचा मोठ्याने उच्चार करावयाचा. यानंतर 'अ' समूहातील मुलांनी त्या संख्येने निर्देशित आकडे क्रमाने व वडीलधाऱ्यास लागलेल्या वेळात मोठ्याने सांगायचे. लगेच समूह 'ब' मधल्या किशोरांनी तितक्याच टाळ्या, त्याच वेगाने वा सावकाशपणे वाजवावयाच्या. टाळ्या वाजविण्याऐवजी पायांनी जमिनीवर आघात करणेही चालू शकते. या तिन्ही क्रिया लागोपाठ करावयाच्या असल्यामुळे भाग घेणाऱ्यांना नीट लक्ष ठेवावे लागते. संख्या उच्चारण्याच्या लयीत - म्हणजे सावकाश वा भरभरपणात वडीलधाऱ्याने कल्पकतेने बदल करावा आणि सुरुवात सावकाशपणे करून पुढे गती वाढवत न्यावी.

टाळ्यांचा पट विणण्याच्या खेळाची आणखीही एक गुंतागुंतीची आवृत्ती शक्य असते. वडीलधाऱ्याने उच्चारलेल्या संख्येच्या दुप्पट इतके आकडे 'अ' गटाने त्याच वेगाने म्हणावयाचे व 'ब' गटाने तितक्या टाळ्या वाजवायच्या. इतर सर्व खेळांप्रमाणे याही खेळात संघभावना, एकाग्रतेने ऐकणे व ठराविक पद्धतीने लगेच हालचाल करणे या गोष्टी सांभाळाव्या लागतात.

छंदोपासनेतले शेवटचे वळण म्हणजे एक प्रकारचा हस्तव्यवसायच म्हणायला हवा. थोडीशी सामग्री आणि थोडासा खटाटोप यांच्या बळावर हे वळण सफाईदारपणे घेता येते.

**छंदोपासनेतील हस्तव्यवसाय :**

संगीताचे दोन मुख्य भाग असतात. त्यांना म्हणतात ताल आणि सूर. या दोहोंचा अनुभव आपल्याला बऱ्याच वेळा वाद्यांच्या माध्यमातून येत असतो. वाद्ये काही नेहमी विकत घ्यावी लागत नाहीत. ती तयारही करता येतात आणि आपण तयार केलेली वाद्ये कशीही ओबडधोबड, लवकर तुटणारी-फुटणारी असली तरीही ती आपण बनविलेली असल्यामुळे जास्त आनंद देणारी असतात. अशी असंख्य वाद्ये, असंख्य तऱ्हांनी बनविता येतात. वानगीदाखल इथे फक्त एक उदाहरण घेतले आहे.

निरनिराळ्या आकाराच्या आणि लांबसर मोठ्या बाटल्या (रिकाम्या) शोधाव्यात आणि प्रत्येकीत अशा तऱ्हेने फुंकर मारावी की, शिट्टीसारखा नाद निर्माण होईल. अशा काचेच्या शिट्ट्या म्हणजे वाद्यांचे नमुने होत. फुंक घालून वाजविण्याची वाद्ये पुष्कळ असतात. पिपाणीपासून ते बासरीपर्यंत. पण सर्वांत समान महत्त्वाची असणारी गोष्ट म्हणजे एकसारखी व सारख्या जोराने फुंक मारणे, तीच गोष्ट इथेही साधावी लागते. एकदा शिट्ट्या निश्चित झाल्या की एकेका मुलाने एकेक घ्यावी व वाजवावी. सर्व नाद ऐकल्यानंतर मग सर्वांत खालचा नाद ते सर्वात वरचा नाद अशा पातळ्या ओळखाव्या व त्या क्रमाने शिट्टी-वादकांनी उभे राहावे. हा क्रम सांभाळून वादन केले की खरे पाहता एक साधी चालच तयार होते. वर-खाली जाणारी. आणखी गुंतागुंत करायची तर नादांचा क्रम (म्हणजेच शिट्टीवादकांचा) उलटसुलट करायचा. उदाहरणार्थ १, ३, ५ व मग २, ४, ६ इत्यादी. जितके नाद अधिक तितक्या चाली तयार होऊ शकतील.

या शिट्ट्यांइतकेच साधे तालाचे वाद्य तयार करावयाचे असेल तर एकच तोंड उघडे असलेले निरनिराळ्या आकारमानाचे लहान-मोठे डबे (रिकामे) शोधावेत. नंतर त्यांची उघडी तोंडे जाडसर, चिवट कागदाने काळजीपूर्वक बंद करावीत. कागद अगदी ताणून चिकटविणे जरुरीचे असते. अशा कागदावर हाताच्या बोटांनी वा पतंगाच्या काड्यांनी हलकेच आघात केल्यावर छोटे ताशे, नगारे तयार केल्याचे समाधान निश्चित लाभेल. डब्यांच्या आकारमानानुसार गंभीर, कडक इत्यादी नाद निर्माण होतील. मोठ्या पणत्या वा छोट्या कुंड्या वगैरेंचाही असाच वापर करता येतो.

**संगीताची नजर :**

मुद्दा असा की, नेहमीच्या हालचालीत वा घडामोडीत, खेळात वा विज्ञानाच्या प्रयोगात कुठेही संगीत दडलेले असू शकते. ते तिथे आहे हे ओळखण्याची शक्ती मात्र हवी. ही शक्तीसुद्धा बहुतेक सर्वजणांत असते. ती सुप्त असल्यास तिला जागी करणे आणि ती जागी असल्यास आळसावलेपणातून तिला चपळपणाच्या राज्यात आणून सोडणे यासाठी नजर लागते. संगीताच्या छंदाच्या मुळाशी ती नजर असते. नजर असली की प्रत्यक्ष शिक्षण घेणे अवघड जात नाही - निदान शिकण्याचा बोजा वाटत नाही.

---